## पुरुषोत्तम पाटील

# ढगांतल्या सावल्या

म. ग्रं. सं. ठाणें.
विषय काव्य
क्र. २३९३
REFBK-0022529
REFBK-0022529

काव्य
दा.क्र. २२५२९
२/१२/८८

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :— खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

27 JAN 1987

(क्र.मा.प.)

१

ग्रेस

संध्याकाळच्या कविता

२

ना. धों. महानोर

रानातल्या कविता

३

अनुराधा पोतदार

आवर्त

४

शंकर वैद्य

कालस्वर

५

वसंत सावंत

स्वस्तिक

६

केशव मेश्राम

उत्खनन

७

सुरेश मथुरे

युकॅलिप्टस

२२५२९
२१/२/७८
संदर्भ
काव्य
२३९३

# तळ्यांतल्या साउल्या

पुरुषोत्तम पाटील

REFBK-0022529
REFBK-0022529

पॉप्युलर प्रकाशन, मुंबई

*Talyantalya Saoolya*
*( Marathi )*
*Purushottam Patil*

तळ्यांतल्या साउल्या

पॉप्युलर प्रकाशन

म—४२७

© पुरुषोत्तम पाटील

श्री शिवाजी विद्या-प्रसारक संस्थेचे साहित्य व वाणिज्य महाविद्यालय, धुळे

पहिली आवृत्ती : १९६८ / १८९९

मुखपृष्ठ : पद्मा सहस्रबुद्धे

मुद्रक : शशिकान्त महादेव देव, सुलभ मुद्रणालय, २९१ शनिवार पेठ, पुणे ४११ ०३०

प्रकाशक : रामदास भटकळ, पॉप्युलर प्रकाशन, ३५ सी ताडदेव रोड, मुंबई ४०० ०३४

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र.

कविवर्य बा. भ. बोरकर यांना
प्रणिपातपूर्वक—

माझ्यासकट ही कविता
तुम्हीं जगवली, सांभाळली.
त्या दिवसांची
आज फार आठवण येते...

—पुरुषोत्तम पाटील

लेखनकाल : १९५२ ते १९७७

श्रेय : सत्यकथा, छंद, प्रतिष्ठान, युगवाणी आणि अनुष्टुभ्.

श्री. पु. भागवत, राम पटवर्धन, व. दि. कुलकर्णी, शंकर पाटील, ना. धों. महानोर, रामदास भटकळ आणि 'एम्.'

## अनुक्रमणिका


आम्ही सुगंधित पुन्हां ११
ऋण १२
झाड १३
पाहुणेर १४
सावल्यांच्या गार गर्द डोळ्यांवर १५
झुळूक १६
लागेल काळोखी १७
हलकी १८
निष्पाप १९
कडा २०
निरोप २१
केतकीचें ऊर २२
कळ २३
मेंदी–पेटल्या हाताची २४
आज अंवस सांवळी २५
चढतीचें ऊन २६
अखेर २७
हातांमध्यें जडला हात २८
कोंवळ्या मंजिऱ्या २९
अंगभर धूळ ३०
तळहात ३१
हुंदक्यासाठीं गळा तेवढा ३२
तुझ्या येण्यासाठीं ३३
अवेळ ३४
बांधुनी नजर ३५
विनंति ३६
वाढलेलीं वर्षें ३७
आभाळ–जिंदगी ३८
आंसवांचें मन ३९
शेवटचा दीस ४०
स्मारक ४१
रान तुझें ४२

जखमी ४३
खूणच उरते ४४
झरा उपसतां ४५
उन्हाच्या देहांत ४६
पानकेवडा ४७
ज्वर ४८
पहांट ४९
खेळ ५०
तिष्ठत रहा ५१
बोभाटा ५२
उघड्यावरतीं ५३
नवी उमटली पाउलवाट ५४
धरतीलाच उकळी फुटेल ५५
तुला साहतांना ५६
आवर्त ५७
हे सैरभैर स्वरांचे पक्षी ५८
हें असमंजस प्रदर्शन ५९
प्रश्न तुझा कलता ६०
गुलाल ६१
इतुकें सोपें ६२
तुला कळालें नाहींच तें ६३
विदेही ६४
हे अभिनयसम्राज्ञी ६५
मुक्ति ६६
डोंगरकपारी उतरतांना ६७
पूर ६८
आठवण ६९
मागणी ७०
खळ्यांत ७१
कांहीं सैलसर शब्द ७२
लग्न ७३
तुझी वाट तीच आहे ७४
तसें कांहीं नाहीं मनीं ७६

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
23९3 वि. क्र.
दा. क्र. 2242९
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

*But in an hour of agony,*
*Pray, speak it, and recall my image,*
*And say, " He still remembers me,*
*His heart alone still pays me homage."*

—*Alexander Pushkin*

## आम्ही सुगंधित पुन्हां

वासनेच्या होकाराला
झेली अल्गद पापणी
देहधून तालावर
आग आंदुडे लावणी

जके-उजके देकार
लालपणीं झाला गुन्हा
लावणीत भिजतांना
आम्ही सुगंधित पुन्हां !

— पुरुषोत्तम पाटील

## ऋण

ठेंच अंगठ्याला लागे
pण पांगुळलें मन
कुण्या जरीच्या चिंधीनें
झाला ऋणाईत व्रण

कृष्णे....
एवढीच आठवण !

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क. ...
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

## झाड

लपूं नका माझ्याआड
        वेडावांकडा उनाड
        मी फांद्यांतुनी लबाड
पाण्यांतल्या सावल्यांशीं
        सारा शृंगार गहाण
        जरा जपा.... माझी आण !

## पाहुणेर

येणाऱ्यासाठीं
लगबग पहांट.... चुळुक् झुळुक् सडा
हलकेंसें स्वस्तिक, फुलकीशी रांगोळी
अन् थोडा दळदार सूर्य....

थांबलेल्यासाठीं
एकुलता पाट, सुगरण ताट
अन् नखललेल्या कोंवळ्या पानांचा
थोडा बेतशीर केशरविडा...

जाणाऱ्यासाठीं
अर्ध्या-उघड्या दाराआडचा
ओझरता इरकली पदर
अन् कांकणांची थोडी अस्वस्थ किणकिण....

## सावल्यांच्या गार गर्द डोळ्यांवर

सावल्यांच्या गार गर्द डोळ्यांवर तुझ्या
ऊन सांडलें तेव्हां
दोन अनावर कवडसे
अलगद आमच्या नजरेवर स्थिरावले.

आम्हीं डोळे मिटले.

मग कानांना हा हंसण्याचा भास...
ऊन ओंठांपर्यंत तर उतरलें नाहीं ?

तें आणखी खालीं उतरूं नये;
असें अवतरण आमंत्रक
आतां हात नाकारतीलच असें नाहीं !

## झुळूक

निरागस हंसूं नये
असें खालच्या मानेनें
( ....वळतांना बोलूं नये
सायवाळल्या ओंठानें ! )

फक्त फेंकावें अत्तर
वारियाच्या झुळुकीनें
माथ्यावरचा पदर
जरा झुकावा लाजेनें....

## लागेल काळोखी

थरारे काचोळी
    ओळखीचा तीळ
नको घालूं पुन्हां
    नजरेची शीळ

सुटतील गांठी
    झळाळ रंगाला....
लागेल काळोखी
    उरल्या अंगाला !

## हलकी

सुनें कधींचें परस
खिन्न वृक्षातळीं माती
माझ्या जडशा वेलीला
पानें भोंवळ आणती

दूर दूर गेलें कोणी
यावें जवळ जोडीनें
माझ्या हलक्या वेलीचें
ओझें झेलावें कळीनें !

## निष्पाप

वाट पाहुनी थकली दृष्टी
पेंगुळले हिरमुसले डोळे
तंद्रींत फुलें स्वप्न एक पण
....मिठींत थरके शरीर भोळें

त्या स्वप्नाला झेलित पदरीं
लेकुरवाळी झाली झोंप
तिला न कळलें अपुल्या हातुन
झालें केव्हां भलतें पाप

## कडा

पहाटेच्या कोवळ्या उन्हांत
भर दुपारची आग प्यालिस कशी ?
उजळ सोनसळा दिवस असून
काजळरातीगत भ्यालिस कशी ?

जाईजुईचा श्वास असून
थेट भेटमोगरी झालिस कशी ?
भोंवळ येणार माहित असून
कड्यावर कां मग उभी अशी ?

## निरोप

हातावरी पुष्पहात
लाजे तळवा कोवळा
सांवळ्याशा बोटांवर
गौर उन्हाचा सोहळा

पांच बोटांत गुंतले
निरोपाचे पंचप्राण
दूर जातांना कशाला
स्पर्शसुखाचें उधाण

आतां अंजली जुळून
हात करिती वंदन
मनगटीं रुतलेलें
फक्त उसासे कंकण....

## केतकीचें ऊर

केतकीचें ऊर....
सुवासले रंग
छांदिष्ट चालींत
डहुळलें अंग

ओंठाशीं थेंबला
चंद्राचा उद्गार
हातघाई झाला
मदालस वार

स्वप्नाशीं मोहून
विझली कुंवार
काजळाचे डोळे
हांसती दुधार !

## कळ

कोसळतें ऊन नवें
        हळद तापलीच जरा
ओंठावर शांत स्मितें
        पण सलतो डंख उरा !

खिदळत हा जलसंचय
        लाटांच्या वनगोष्टी
एकटीच छायाकृति
        विरघळतांना कष्टी....

तळ दूरांत विश्रब्ध
        किरणांच्या स्पर्शानें
कळ कोऱ्या उन्हांतली
        जपली पण डोहानें !

## मेंदी-पेटल्या हाताची

मेंदी-पेटल्या हाताची
आज धग ही अंगाला
उधाणतें गोरें सुख....
...सुख मनाच्या मिठीला

डूल डोले कानांतला
जातो चुकोनिया श्वास !
रागावला ओंठ रुसे
हवाहवासा हा भास

हाताहुनी शिरजोर
हटवादी हिर्वा चुडा
हंसायला युग लागे
रडायला वेळ थोडा !

कपाळींची चांदकोर
मात्र लाजून वितळे
कसा बिंदीभाळीं एक
थेंब गुलाली ओघळे !

## आज अंवस सांवळी

आज अंवस सांवळी
हांसे लाख चांदण्यांनीं
मेघ लाघट पळाले
क्षुब्ध वाऱ्याच्या बोलांनीं

तेंच चांदण्याचें हांसू
प्यालें ओढ्याचें हें पाणी
कशी नशेंत बेभान
त्याची खळखळ वाणी

कांठावरी उभी राई
डोले, उसासे तृप्तींत
अनावर ओढ्यावर
ढाळी सुखाचें संगीत

सारें खुषींत हें रान
अशी अंवस सुखाची
आणि त्यांतहि हळूंच
चळे शेज काळोखाची...

## चढतीचें ऊन

चढतीचें ऊन
घाशी गोरी पाठ
बाभुळफुलांचा
हळदीचा थाट

लालवण पोत
पेटते गळ्यांत
कधींचाच ताप
हिमानी कळ्यांत !

डोहाच्या कांठाशीं
नजर लागते
विर्घळून रूप
लाट दृष्टावते

...चढतीचें ऊन
जळीं उतरतें
गोऱ्या पाठीवर
पदर घालतें !

## अखेर

ओठंगून उभें दार
उंबऱ्यांत छाया झुरे
चौकटीचें सुनें मन
झालें उन्हांत दुखरें

लवंडलें होतें माप
उधळले मोती मोती
एक एक वेचतांना
पदरांत झाली माती

....वाजे जोडीनें पाऊल
आतां घायाळ चाहूल
एक पंछी गेला आणि
दुजा झाला रानभूल

ओठंगून उभें दार
शोक छायेनें करावा
चौकटीच्या उरीं एक
शुष्क हुंदका फुटावा...

## हातांमध्यें जडला हात

हातांमध्यें जडला हात
रात उशाशीं रडते आहे
काळ ताणला जरि ताऱ्यांनीं
जखमी क्षण तो स्फुंदत राहे

प्रकाश मिंधा, चंद्र घातकी
अमृतासही नाट लागली
ओंजळींतल्या प्रतिबिंबाला
आंसवांत ह्या भोंवळ आली

## कोंवळ्या मंजिऱ्या

कोंवळ्या मंजिऱ्या
डोलती, डोलूं दे
अंजिरी साडीला
सुवास झेलूं दे

वेंधळ्या वाऱ्याला
फेकूं दे पदर
निरीला रेखूं दे
रोखली नजर

अपाप पाऊल
पडूं दे जोडून
कशाला मोजावी
जोडव्याची खूण

कोंवळ्या मंजिऱ्या
झुलती, झुलूं दे
अंजिरी साडीला
चांदणें मागूं दे !

## अंगभर धूळ

टपोऱ्या डोळ्यांतली संऽथ तहान
(तूं तंर अजून खळखळ लहान....)

झाडाच्या आडोशाला फडफडतो पदर
(फांद्यांना माहीत कुठला हा बहर....)

उगाचच तोंडावर फिरतो हात
(ओंठावर खुणा...आपलेच दात ?)

आभाळाला भोंवळ....मातीशीं लगट केलिस कां ?
(अंगभर धूळ....तरी गालांत हलकें हंसलिस कां ?)

## तळहात

असा कसा तळहात...
रुळ्या रेषांचीं अक्षरें
जन्मभरी घासलेली
राख भांड्यांची निखारे

असा कसा तळहात
पाणी शेंदून गठाळे
जन्मभरी ओढलेलें
चाक, रहाट उमाळें

असा कसा तळहात
किती चटके लागती
भाकरींच्या चळतींच्या
खुणा चुलीला राहती

असा कसा तळहात
कढ जात्याच्या तळीला
निद्राधीन सारी रात
जाग एकट्या ओवीला

असा कसा तळहात
सुन्या कपाळीं लागतो
विनाबांगडीचा बोल
स्वप्नांतही आक्रोशतो

## हुंदक्यासाठीं गळा तेवढा

वक्षावर ठेवलें माथें, तरी न कळतात स्पंदनें
कोमट आसवें गालावर....तेवढींच माझीं वंदनें

अनायास मिठी हातांची, पण रुतलीं नाहींत बोटें
नाहीं उसवलें मन...पण शरीर थरारलें खोटें खोटें

डोळ्यांत थेट पाहिलें तरी नाहींत झाल्या वेदना गोळा
विझून नजर मिटतात पापण्या, एवढाच खेळ भोंवळभोळा

अलवार ओंठ स्वागतसिद्ध, पण स्पर्शच विद्ध झालेला
हुंदक्यासाठीं गळा तेवढा फांसावांचुन उरलेला

## तुझ्या येण्यासाठीं

तुझ्या येण्यासाठीं
साठविलें देणें
हातोहात घेणें
देहस्वप्न

अंतरींची आग
बकुळफुलांची
झुले वासनेची
रत्नशाखा

नाहीं विरलेला
अनुराग ओंठीं
आठवणीसाठीं
दंश उरे

हांसरेपणाचा
झुरतो इषारा
कुसुंबी निवारा
श्वासरंगा

—लाज धीट होतां
बरळेल रात
आतां हारजीत
पाहूं नये !

## अवेळ

कशासाठीं ओठीं
झुंजुमुंजु गीत
विकली मी प्रीत
सांजवेळीं

वेडावले हात
गुंफिशी गळ्यांत
येथें अर्धी रात
आंधळीच

कशाला ही आतां
ओलावे पापणी
पापाची लावणी
झाल्यावरी ?

फुटूं दे हुंदके
ओंजळ गहाण
माझ्याशीं इमान
नाहीं माझें

## बांधुनी नजर

बांधुनी नजर
मला ओढिलेंस
दुःख वेढिलेंस
देहाकारें

देहाचा निर्वाळा
देह देईनाच
सक्तीचा हा कांच
व्रणवंता !

( दूर गेलों तरी
ओरखडा हांसे
रक्ताचे उसासे
पुनःपुन्हां... )

## अवेळ

कशासाठीं ओठीं
झुंजुमुंजु गीत
विकली मी प्रीत
सांजवेळीं

वेडावले हात
गुंफिशी गळ्यांत
येथें अर्धी रात
आंधळीच

कशाला ही आतां
ओलावे पापणी
पापाची लावणी
झाल्यावरी ?

फुटूं दे हुंदके
ओंजळ गहाण
माझ्याशीं इमान
नाहीं माझें

## बांधुनी नजर

बांधुनी नजर
मला ओढिलेंस
दुःख वेढिलेंस
देहाकारें

देहाचा निर्वाळा
देह देईनाच
सक्तीचा हा कांच
व्रणवंता !

( दूर गेलों तरी
ओरखडा हांसे
रक्ताचे उसासे
पुनःपुन्हां... )

## विनंति

तुला विसरून
समोर ये पुन्हां
पोटीं घाल गुन्हा
वळतांना

असें येणें....जाणें
शापित पायांनीं
हंसू दे कांट्यांनीं
ओढवाट

केव्हांतरी सारी
सरेल भ्रमंती
तेव्हां ही विनंती
गेलेल्याची–

मला आठवून
लाव कुंकू भाळीं
पायघड्या घाली
येत्यासाठीं

## वाढलेलीं वर्षें

वाढलेलीं वर्षें
जरावृद्ध प्रीती
यौवनाची स्मृती
रेखागर्भ

निवान्ताची हांक
धडपडे ओंठीं
व्याकुळता पोटीं
गाजतसे

मायेचा मामला
हाताळला दूर
आसवें तों क्रूर
अनाहूत

सोडतां येईना
अनाडी ही गांठ
जरी मान ताठ
तिरडींत

## आभाळ-जिंदगी

आभाळ-जिंदगी
साठविली डोळां
अवघाचि भोळा
　　　पापण्यांत

मिटल्या पापण्या
स्वप्नें थरारलीं
एक एक झालीं
　　　अश्रुसत्य

भोंवळें आकाश
प्रकाश कोसळे
धरित्री व्याकुळे
　　　भिजतांना....

## आसवांचें मन

आसवांचें मन
वाहुनिया गेलें
आपसुख झालें
पाप रुखें

वैराणशा डोळां
वासना धुमारे
पापणी थरारे
अगतिक

घामेजला बोल
झोंबतो तमाला
उकळे उमाळा
ठिणग्यांचा

अनावर हात
झेंपावतो पुढें
व्याकुळांत बुडे
तृप्त स्पर्श

उदार दिलेंस
सुख हें सैताना
(तुझी रे वेदना
माझ्या शेजीं !)

## शेवटचा दीस

काय सोपें गाऊं
आशयाचे सूर
शब्द माझे चूर
अशक्यांत

दाखवाव्या कैशा
जखमा अडाणी
प्रीतीची कहाणी
प्रेतासाठीं

उराउरीं भेट
काळजाची वेठ
खोव्याची ही पेठ
उघडिली

वेदनेचा वाण
मला मी वांटिला
देकार राहिला
अन्तासाठीं

शेवटचा दीस
किती कडू व्हावा
अश्रूंनीं नहावा
रामराम....

## स्मारक

शब्दांना ती नव्हती हिंमत
पुढें व्हायची, हटवायाची हट्टी ओंठ;

पाउल आतुर खिळलें
मळली वाटच चार वितींची;

...आणि लाजरी कष्टी दृष्टी
बिलगुन बसली धरणी उकरित त्या पायाशीं

स्मारक हें
या निष्ठुर, चंचल हृदयीं
हळुवार कसें कोरियलें
बेईमान नजरेनें माझ्या....

## रान तुझें

रान तुझें
तुझेंच
कांटेरी भुलवें

भान तुझें
तुझेंच
बेसावध मिरवें

साद तिथें
तिथेंच
घुसमटतीं पातीं

याद तिथें
तिथेंच
हुरहुरते माती....

## जखमी

पाहुं नको रे
गोंधळलेले
स्वप्नरंग हे
अंगांगांवर
(जरि झाला जय!)

मिटून घे ना
छद्मी डोळे
विश्रब्ध अतां
मला मोजुं दे
जखमेचें वय....

## खूणच उरते

खूणच पुरते
पापणींतल्या
मासोळीची

    खूणच उरते
    जरा उसवल्या
    काचोळींची

खूणच पुरते
अर्ध्यामुर्ध्या
निःश्वासाची

    खूणच उरते
    घट्ट गांठिच्या
    विश्वासाची....

## झरा उपसतां

झरा उपसतां
कवळ्या हातीं
शरीर थोडें
व्यस्त वाकलें
कोरे बिल्वर
होउन ओले
खळ्कन् किणतां
जरा लाजले

खरें सांगतों
झऱ्यांत तेव्हां
आम्हीं नुसतें
अमुचें केवळ
प्रतिबिंबच कीं
झुलत पाहिलें....

## उन्हाच्या देहांत

हलक्या स्पर्शांत
गळाजड हात

टपोऱ्या डोळ्यांत
डोळे पाहतात

मिटल्या ओठांत
व्रण हासतात

कांचल्या वळांत
कळा उन्हतात....

उन्हाच्या देहांत
साउल्या होतात !

## पानकेवडा

पानकेवडा
केव्हढा केव्हढा
सुगंधी देहांत
एव्हढा....एव्हढा

पानकेवडा
कुठला कुठला
रंगांतून सूर
फुटला फुटला

पानकेवडा
कुणाचा कुणाचा
दळदार गर्भ
उन्हाचा उन्हाचा....

## ज्वर !

अग्नीमधल्या
न्हाणवलीला
दाहुन देहा
आज मिळालें
अनगड देणें
अनर्थवाही....

लाजुन ज्वाला
वळल्या खालीं
पायतळींचा
बनुनी अळिता,
अन् चढला ज्वर
आम्हालाही !!

## पहाट

गुंगींतली पहांट
आडावरचा रहाट

खडखड पव्हरा
झोपलेला नवरा
जडभार कळशी
जपून वळशी
शिंपून अंगण
भरून रांजण
भिजलेले ओंचे
ओलवण कांचे....

आडावरची पहांट
गुंगलेला रहाट !

## खेळ

तूंच म्हणालिस
रोखुन डोळे
( वेळ साधुनी ) :
‘ खेळ असा का
कधीं रंगतो ?’

पाठ फिरवुनी
हंसत सहज, पण
सावध वदलों :
‘ ताल असा का
तोल मागतो ?’

तोंच पाहिलें
नजर झुकवुनी
जहर घोटतां
थेंब सुखाचा
कसा ठिबकतो...

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
९३०३ वि. क्र.
दा. क्र. २२५२९
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

## तिष्ठत रहा

बोलत रहा
झुलत रहा
    शब्दच दिल्यावर
    निःशब्दाखातर
    ऐकत रहा.

भेटत रहा
पेटत रहा
    विझून आल्यावर
    सांजक्षितिजावर
    रंगत रहा.

देखत रहा
रेखत रहा
    रूप-अरूपावर
    तीट लावल्यावर
    तिष्ठत रहा....

## बोभाटा

कसुन रेखला
त्या पदरानें
घट्ट लपेटुन
तनुवेलीचा
        कवळा ताठा

खण चोळीचा
रुतुन राहतां
लाल वळाची
खूण मिरविली
        जरिच्या कांठां

तंग पोपटी
नेसुं कांचतां
चाप लागुनी
संथ चालिचा
        हो बोभाटा....

## उघड्यावरतीं

परवलांतलें
कळे न लाघव
हांक धीट ती
फेंक भाबडी

फिके इषारे
नकोत आतां
आण गळ्याची
हवी तेवढी

जुनीं पुराणीं
नकोत वळणें
सराइताच्या
चाली सावध

वाट असूं दे
थेट नीट अन्
उघड्यावरतीं
घडुं दे पारध...

## नवी उमटली पाउलवाट

नवी उमटली पाउलवाट
आंब्रेवनिंच्या ओढ्याकांठीं
दोन सांवल्या चुकल्या हटकुन
दाट तेथल्या छायेसाठीं !

ती सावध राई वृक्षांची
तें मिस्किल हंसणारें पाणी...
चुकणारांचें सजलें स्वागत
कुजबुजणाऱ्या पानोपानीं !

रित्या जाहल्या गौर ओंजळी
किती वर्तुळें जळांत विरलीं...
बघतांना थरथरत्या छाया
झुकून हंसली सोनडहाळी !

....आणिक झाला चोळामोळा
हांसत हांसत पाचोळाही
चूर जाहले लाजुन मात्र
तिथें कवडसे नवखे कांहीं !!

## धरतीलाच उकळी फुटेल

बेहोश सुगंधी कचभार
आणि माझें प्रौढ सावध अवघ्राण....

आतां आकाश खालीं वाकणार नाहीं
धरतीलाच उकळी फुटेल !

## तुला साहतांना

तुला साहतांना
निलाजरें पल्लवगान
एक धून मधूनशी
सळसळत येणारी
परागांना कळणारी
लडिवाळ लय
वि ल य....

तुला पाहतांना
लाजलाजरें सावरवस्त्र
एक भूल.... कबूल
बिंदी झुकविणारी
म्हणूनच हें
डोळ्यांत आवरलेलें जळ
नि त ळ....

## आवर्त

तरल्या नजरेची जडावलेली हांक
मऊ निसटत्या शब्दांचा कोरीव अर्थ
चोपीव पुऱ्या वस्त्राचा भावही उधळा....
संथ चालीची अन् आगिनघाई....

समजतों मी, येतें आहे
परिचित तुफानवारें
अपरिचिताचें उठवित आवर्त नवें !

## हे सैरभैर स्वरांचे पक्षी

हे सैरभैर स्वरांचे पक्षी
शान्त निवान्तांत मंजुळ नक्षी कोरीत
तुझ्या ओठांवरून जेव्हां
माझ्याकडे झेंपावत आले

तेव्हां
पिंजऱ्यांतला मी
कृतज्ञ पंखांनीं
त्यांना विंझणवारा घालीत
फडफडलों.
( कुणी म्हणोत–
तडफडलों....)

## हें असमंजस प्रदर्शन

बेतास बात बोलून सुद्धां
शब्द बेईमान होतात,
रुजवून ठेवतात राजस हेतू
तिच्या उत्सुक कर्णफुलांत.

आणि मनांत धुमारे फुटतात.
तिच्या वाह्यात देहाच्या बिलोरींत
झगमगूं लागतात त्यांचीं लाखेरीं प्रतिबिंबें.

हें असमंजस प्रदर्शन
कांहीं क्षणांसाठीं खुलें आहे,
डोळ्यांनीं समंजसपणें बेतास बात पहावें
चकित न होतां.

## प्रश्न तुझा कलता

प्रश्न तुझा कलता
( भलभलता ! )
कोसळतां सुन्न मनाच्या घरट्यावर,
चाळवलीं
सुप्त तृषेचीं भूलपांखरें
जीं भ्रमतीं आतां
आर्त अनावर
स्वैर वर्तुळें तुझ्याभोंवतीं
चंचल आतुरशीं कोरित.

चाळवलें विश्व एक
आणि मात्र तूं
स्तब्ध उभा निश्चल केवळ
विश्वामित्राच्या आचमनांतिल
प्राशुनि म्हातारें अनुभवजळ.

## गुलाल

पानांच्या कुजबुजीइतक्या
नाजुक निःश्वासांच्या शपथा
शरमलेल्या.

नजरेंत तरंगणारीं
अलवार आश्वासनें
आसवांत गोठलेलीं.

तरीहि—
धुळींत पैंजण तुटलेलीं
समुत्सुक पावलें
गुलाल उधळीत
परत फिरलेलीं...

## इतुकें सोपें

इतुकें सोपें....हांकेला नच उत्तर देणें
पाठ फिरवुनी माथ्यावरुनी घुंघट घेणें
उरीं अनावर स्वस्तिकांतले हात बांधणें....!

अधिक सोपी... पुढिल स्तब्धता, तसें थांबणें
पायामधल्या मासोळीचें मौन पाहणें
विघड बांगड्या हातांमधल्या काढुन घेणें....!

सोपें याहुन... कमरमेखला संथ निखळणें
अधीर पाटल पळसफुलांचा जाळ पाहणें
नजर पेटतां त्या रंगांनीं दिवस विझविणें...!!

## तुला कळालें नाहिंच तें

तुला कळालें नाहिंच तें
कीं आसुसला होता वारा सोंसाट्याचा,
घुसळायाला लाघट शांती
उत्सुक होती किती तीव्रता मनांतली तडफडती,
होता झालेला बेभान जरा आवेग,
उतट तृप्तीची तहान त्याची
जळजळणारी क्षणाक्षणाला...

तुला कळालें नाहिंच तें, पण
तुला मिळालें सारें सारें–
अंध असोशी, भ्रान्त तीव्रता, घायल तृप्ति
जेव्हां
बंडखोर तो वादळवारा पडल्यावर,
हरल्यावर,
पाहिलेंस तूं धुगधुगणारें श्रान्त कलेवर त्याचें.

## विदेही

अतूट मिठीच्या आवेगांत
तुझें दैन्य मी पाहिलें नाहीं,
सारा विखार पचवूनहि
विझवीत राहिलीस कृतघ्न निखारे.
स्वागताची साद देत राहिलीस,
हसत राहिलीस, रिझवीत राहिलीस.
डोळ्यांतल्या चंचल सुर्म्यांतहि चिमधार करुणा होती.
पुरुषी क्रूरतेला अलगद झेलणारी सख्त माया
तुझ्या सराईत हातांत कोठून आली ?
जास्वंदीचे कृत्रिम ओठ... पण त्यांतहि
कुजबुजणारें इमान, प्रामाणिक थरथर....
माझ्या वासनेलाहि चकित केलेंस.

दुःख बुडविण्यासाठीं आलेल्या या देहांतील
पश्चात्तप्त मन
तुझ्याच अबोली दुःखानें सुखेनैव विदेही झालें आहे.

धन्यवाद !

## हे अभिनयसम्राज्ञी !

तुझें अटकनाटक....
पण मी पडदाच पाडला.
असल्या इरसाल प्रेक्षकापुढें
हंसायचें, रुसायचें नसतें,
हरायचें असतें.

नंतर भलेंच
या अनुभवाचा अभिनय
तूं दुसऱ्यापुढें कर
मी नांदी म्हणेन
( नांद्यन्ते सूत्रधारः ! )
तो मीच असेन
म्हणून मात्र बिचकूं नकोस;
समोरच्या बावळट प्रेक्षकापुढें
तुला हंसायचें, रुसायचें आहे
त्याला हरविण्यासाठीं.

तुझें कपटनाटक....
पण मी आतां पडदा कशाला पाडूं ?
हे अभिनयसम्राज्ञी !

## मुक्ति

वाटतें
मरणाचें बाशिंग बांधलेल्या या भारलेल्या वेळेला
उरलेल्या घटिकेंत
माझा घुंगट मागें सारावा,
माझा बेचव चुडा चाळवावा,
आणि हा बेवारशी हात
माझ्याच हरवलेल्या कपाळीं मारून घ्यावा.

चुडा पिचेल पण मन चेवणार नाहीं,
मरगळलेले ओंठ
हुंदके मुसमुसणार नाहींत,
कांपणाऱ्या बोटांची वेडी आंवळ
नसा चाळवणार नाहीं,
अशी नशा.... नासवलेली.

सोड ना आतां....
थकला आहे हा अनामत प्राण
शपथेच्या नाजुक देहांत,
तुझ्या शिळेची ओशाळी हांक
तो उच्छिष्ट उःशाप
तोहि मला चालेल.

## डोंगरकपारी उतरतांना

डोंगरकपारी उतरतांना
खरचटलेल्या पायांना
भोळे सुस्कारे ऐकवूं नकोस,
मळलेल्या हिनकळी पानांचा हिरवा रस
त्या हंसऱ्या जखमांना चोळतांना
हुरहुरून दिवास्वप्नांत चळूं नकोस....

ओढ्यांतील ओले पाय आणूं नकोस,
जिवाहून बिलगलेली
वाटेवरची गुलालमाती
नकळत भाळीं लावूं नकोस,
असा आडवा मळवट भरून
अधांतरीं नजर अडवूं नकोस,

आणि
पाटींतलीं फळें—फुलें
या रिक्त हातीं
सक्तीनें निरवूं नकोस,
दिलगीर आहेत घेणाराचे हात....
कृतज्ञतेच्या फक्त नमस्कारासाठीं
जुळलेले
( कधीं तरी असेच जळलेले ! )

## पूर

भाळावरची उद्धट बट
दोन बोटांच्या चिमटींत धरून
अपऱ्या नाकाच्या शेंड्यापर्यंत ताणीत
तूं म्हणालीस...
तें मी ऐकलें नाहीं
मी फक्त पहात होतों— चि त्र.

झटक्यांत
बटा सांवरीत, कोरें नेसूं आवरति
तूं उठून उभी राहिलीस
चाळवीत स्वतःला,
नव्या वस्त्राला, सळसळत....
मी पहात नव्हतों
फक्त ऐकत होतों- स ळ स ळ.

जातांना
पाठमोरी वळून
भडभडून अल्लड म्हणालीस,
' इतकी तब्येत बिघडलीय्
बाईंनाच सांगत्ये. '

मी ऐकत नव्हतों
नव्हतों पहात
फक्त वहात होतों— पु रां त.

## आठवण

तेजानें दाटलेली दुपार,
चमचमणारें ओढ्याचें पाणी,
खळखळणारा नादिष्ट नाद,
कांठावर जांभळीच्या झाडाखालीं
शान्त उभें गोठलेलें लावण्य.

एक शुभ्र चित्र.

झुकत्या चरणांची स्थिरावली ऐट,
आलिंगन आरस्पानी हातांचें
चकाकत्या घटाला,
ओघाळ ओढणी उदार कांहींशी....

दिसते समोर—
चमचमती धारा,
उसळती कळा बाळलाटांची;
तरते नजर अविरतपणें तेथें—तेथेंच.
येतो एक क्षण
जेव्हां मिटतात डोळे,
अधिकच तेजानें दाटते दुपार,
उकळतें पाणी ओढ्याचें सारखें,
नादानें गर्जतें परिसर सारें,
आणि
जांभळीच्या झाडाखालचें शुभ्र चित्र
कोसळतें खालीं
भर दुपारच्या अंधारांत.

## मागणी

कोरून काढलेली कोरीच धुंद नवती
घनदाट वासनेचे कसबी नवे इषारे !

शिस्तींत देह सारा ती ताठली उभारी
ही आग पेटलेली डोळे स्वतः पिणारे !

पेंचांत चाल उलटी रस्ताच रापणारी
वाटेंतल्या धुळीला वश ते गुलालतारे !

ओथंबुनी म्हणाले डोळे हलाल दोन्ही :
अमुचा विडा अभोगी द्या ओंठ रंगणारे !!

## खळ्यांत

हल्क्या अल्लद सावल्या,
आभाळावर चढणारा अरुवार अंधार,
विवस्त्र चांदणी पहिली,
झुरणारी, झरणारी,
मनांत वेडगाणें पेरणारी.

खळ्यांतली पात मंदावलेली,
जिवलग जित्रपाच्या गळ्यांतले घुंगुर
मधूनच रुमझुमून थांबलेले,
साळीची विस्कळित पेंडी
उशाला घेऊन तूंही तशीच पडलेली.

चल ऊठ,
सरत्या सांजेचे हे जळलेले चार क्षण
आतां उरलेली रात्र पेटवणार नाहींत;
दिलदार पदर कमरेला खोंचीत
चाहुरावर उभी राहून
उपणवाऱ्याला साद दे.

पाटींतलं भूस उडवतांना
तुझ्या डोळ्यांत कुसें गेलीं तर
खालच्या मानेनें मी
जमिनीवरची रास निरखीत राहीन
तेव्हां नजर ओलावेल ती माझी.

## कांहीं सैलसर शब्द

कांहीं सैलसर शब्द
ओठांतून घरंगळल्यावर
आम्ही घसरलों.

तेव्हां सावरायला
पुढें झालेले तुझे
सजग सावरीचे हात
हलकेच उशी झाले
आमच्या खुषीसाठीं.

त्या निःस्तब्ध बांधावर
अस्फुट सीत्काराच्या सत्कारांत
आभाळांतल्या मावळताऱ्यांनीं
रात्र किती लहान केली....

आणि आतां
पदराच्या वाऱ्यानें रांगत राहणारा
संथ गारवा
गालावर खेळवीत
हळूच खिळविते आहेस
लाजरी नजर
उगवतीच्या तेजोगर्भांत !

## लग्न

‘ वाजवा रे वाजवा ’च्या कोलाहलांत
अंतरांत जोपासलेल्या प्रीतीचे बारा वाजतात.

अक्षतांच्या क्षणैक दुडक्या बरसातींत
वाहून जातात अनावर अहेव निष्ठा
आणि एक अदृश्य वैधव्य
मुंडावळ्यांच्या कलाबतूंत चमकूं लागतें.

हळदीच्या गोरेपणांतून
बेईमानीचा काळा ओघ
ओघळतो सर्वांगभर.

हाताला हात....( जिव्हाळ्याला तांत )
मग जिंदगीभरची सोबत म्हणून
‘ नातिचरामि ’चा घोगरा स्वर
मख्ख मुखांतून घुमूं लागतो
पदरगांठीचें पावित्र्य गोठवीत.

सात पावलांचे पिवळे ठसे
चिरडले जातांना दुसऱ्या सात पावलांनीं
होमाचा धूर फक्त उसासतो.

आणि
मंगळसूत्रानें गळा पारधला जातो
तेव्हां त्या ‘ चौदा कॅरट ’च्या तेजानें
चार डोळे चमकतात ( दचकतातहि ! )

## तुझी वाट तीच आहे

माझ्या दुर्दैवाला हंसतांना
तुझ्या मनाचा उत्तुंग मनोरा
अवचित खचतो;
निर्दय अभिमानांतच
शहारतेस तूं अबोध धक्क्यानें;
आसवांचे अनाहूत बाळमोतीं
किनारतात ताठर पापण्यांना.

मला हें कळतें,
मातीला मिळण्यापूर्वी मी
असाच होतों—
उंच, ताठ, बेगुमान....
ती एक अशीच होती—
नाजुक पारिजात; ओला चंद्र,
लाजाळूचें रोपटें....

एकदां
बावरलेल्या डोळ्यांत
मी पाहिला घाबरलेला धीटपणा
ज्यानें विचारला व्याकुळ प्रश्न
सकाळच्या कोंवळ्या वेळेला,
आणि मी दुपारचा सूर्य बनलों
अकारण, अकारण....
(अशीच असते ही आंधळी धुंदी)
हंसलों तुच्छतेनें तिच्या लाचारीला.

तिचें जाणें...
युगायुगाच्या निःशब्द छायेची वाटचाल,
तिचा आक्रोश जड पावलांचा
पसरला दूर–दूरवर त्या लांबणाऱ्या छायेप्रमाणें;
त्याच वेळीं खचलें ना मन
उद्धट अभिमानहि कांपला लाजेनें
डोळ्यांना झाला अग्नीचा पश्चात्ताप
पावसाचा उःशाप खळखळला अविरतपणें.

मला हें आठवतें,
मातीला मिळण्यापूर्वी असें कांहीं घडलें होतें.

आज भीक मागतांना अगतिकपणें
तुझ्या बेबंद ओढीची
तुझ्या ऐटबाज तिरस्काराचा बाण
रुतला आहे या थकलेल्या हृदयांत;
परंतु खुपत नाहीं हें शल्य
कारण
तुलाहि गेला आहे पूर्ण तडा
माझ्याचप्रमाणें.

तुझ्या मनाचा खचणारा मनोरा....
तुझें शहारणें.... तुझीं दरकारीं आसवें
मला कळतें–
तुझी वाट तीच आहे....

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
१३०३ वि.
दा. क्र. २२५२९
ग्रंथ - शाखा (स्थळ प्रत)

REFBK-0022529
REFBK-0022529

## तसें कांहीं नाहीं मनीं

अनायास वाहे पाणी
तशीं सहज बोलणीं

ऊन कुरवाळे माती
तशा नजरा स्पर्शती

जुळे आपट्याची पात
तसे हातावरी हात

जळीं तरंगतो वारा
तसा देहांत शहारा

तसें कांहीं नाहीं मनीं
फक्त अशा आठवणी !